विषय : दिनांक 01/7/2018 या अर्हता दिनांकवर आधारित नांदेड शीख गुरुव्दारा सचखंड श्री हजूर अपचलनगर साहिब मंडळाच्या तीन सदस्य निवडणुक मतदार यादी कार्यक्रम ( मतदार यादी तयार करणे व प्रसिध्दीचा कार्यक्रम )

महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग , अधिसुचना क्रमांक जीयुआर-2018/ प्र.क्र.67/ज-7(अ) , दिनांक 27 जून 2018 नुसार नांदेड शिख गुरुव्दारा सचखंड श्री हजूर अपचलनगर साहिब मंडळाच्या तीन सदस्यांना निवडुन देण्यासाठी 1 जूलै 2018 रोजी महाराष्ट्र विधासभा मतदार यादी प्रसिध्द केल्यानुसार या यादीला अर्हता दिनांक मानुन औरंगाबाद, बीड, जालना, लातुर, उस्मानाबाद, परभणी, हिंगोली व नांदेड या संपुर्ण जिल्हयांचा आणि चंद्रपुर जिल्हयातील राजुरा, कोरपना व जीवती या तालुक्यांचा समावेश होतो. सदर भाग हा तत्कालीन हैद्राबाद राज्यात समाविष्ट होता या भागातील शिख मतदार यादी तयार करण्याबाबत उपरोक्त प्रमाणे निर्देशीत केल्यानुसार नांदेड शिख गुरुव्दारा श्री सचखंड हजूर अपचलनगर साहिब बोर्ड निवडणुक नियम 1963 मधील तरतुदीनुसार खालील प्रमाणे मतदार यादी कार्यक्रम जाहीर करण्यात येतो.

मतदार यादी कार्यक्रम

| अ.क्र. | विवरण | कालावधी |
|---|---|---|
| 1 | अर्हता दिनांक 1 जूलै 2018 रोजी महाराष्ट्र विधानसभा मतदार यादी | महाराष्ट्र विधासनसभेसाठी दिनांक 1 जूलै 2018 रोजी तयार केलेल्या व प्रसिध्द केलेल्या मतदारांच्या यादीवरुन |
| 2 | मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी Form I भरुन देणे (नियम 5) | दिनांक 20 जूलै ते 18 ऑगष्ट 2018 (30 दिवस) स्थळ : संबंधीत तहसील कार्यालय |
| 3 | प्रारुप मतदार यादी तयार करणे ( नियम 6 व 7) | दिनांक 19 ऑगष्ट ते 25 ऑगष्ट 2018 सक्षम अधिकारी : जिल्हाधिकारी नांदेड |
| 4 | प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करणे (नियम 8) | दिनांक 27 ऑगष्ट 2018 |
| 5 | दावे व हरकती स्विकारण्याचा कालावधी (नियम 9) Form II नुसार | दिनांक 28 ऑगष्ट ते 26 सप्टेंबर 2018 सक्षम अधिकारी : संबंधीत तहसीलदार |
| 6 | दावे व हरकती निकाली काढणे, (नियम 10(i)) | दिनांक 27 सप्टेंबर ते 04 ऑक्टोबर 2018 सक्षम अधिकारी : जिल्हाधिकारी नांदेड |
| 7 | जिल्हाधिकारी नांदेड यांच्या निर्णयाविरुध्द अपील दाखल करण्याचा कालावधी ( नियम 10(2)) | दिनांक 05 ऑक्टोबर 19 ऑक्टोबर 2018 सक्षम अधिकारी : मा. विभागीय आयुक्त औरंगाबाद . |
| 8 | मा. विभागीय आयुक्त यांच्या कडे दाखल झालेली अपील प्रकरणे निकाली काढण्याचा कालावधी | दिनांक 20 ऑक्टोबर 26 ऑक्टोबर 2018 सक्षम अधिकारी : मा. विभागीय आयुक्त औरंगाबाद |
| 9 | अंतिम मतदार यादी प्रसिध्दी बाबत (नियम 11) | दिनांक 3 नोव्हेंबर 2018 |

जिल्हाधिकारी नांदेड

Scanned by CamScanner

**नांदेड शिख गुरुव्दारा सचखंड श्री हजूर अपचलनगर साहिब मंडळाच्या तीन सदस्यांची निवडणुक 2018 करीता सूचना**
**(नियम तीन पहा)**

नांदेड शिख गुरुव्दारा सचखंड श्री हजूर अपचलनगर साहिब मंडळाची निवडणूक घेण्याचे शासनाने ठरविले असून नांदेड शिख गुरुव्दारा सचखंड श्री हजूर अपचलनगर साहिब अधिनियम 1956 च्या कलम 6 पोटकलम दोन अन्वये बोर्डाचे तीन सदस्य निवडून देण्यासाठी मतदार यादी तयार करावयाची आहे. मतदार यादीत आपले नांव दाखल करुन घेणा-यांसाठी खालील सूचना देण्यात येत आहेत.

1. नियम तीन खाली शासनाने दिनांक 01 जूलै 2018 ही अर्हता तारीख निर्दिष्ट केली आहे. तरी मतदार यादीत नांव दाखल करण्यास पात्र असलेल्या मतदारांना दिनांक 20 जूलै 2018 या तारखेपासून 30 दिवसांत त्यांचे नांव मतदार यादीत नोंदविता येईल.
2. महाराष्ट्र विधानसभा निवडणूकीसाठी असलेल्या मतदार यादीत दिनांक 01/07/2018 रोजी ज्यांची नांवे आहेत व जे सामान्यत: जून्या हैद्राबाद संस्थानचा भाग महाराष्ट्र राज्यात समाविष्ट केलेल्या भागात राहतात. (औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, उस्मानाबाद, नांदेड, बीड लातूर, हे जिल्हे व चंद्रपुर जिल्ह्यातील राजूरा, कोरपणा, जीवती तहसील) अशा सर्व शिख मतदारांना या निवडणूकीसाठी तयार होणा-या मतदार यादीत नांव नोंदविता येईल.
3. महाराष्ट्र राज्यात सामील झालेल्या भूतपुर्व हैद्राबाद राज्यांच्या भागात अर्थात औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, उस्मानाबाद, नांदेड, बीड लातूर, हे जिल्हे व चंद्रपुर जिल्ह्यातील राजूरा, कोरपणा, जीवती तहसील भाग हा मतदार संघ आहे. सामान्यत: या क्षेत्राबाहेर राहणा-या शिख मतदारांना मतदार यादीत नांवे नोंदविता येणार नाहीत.
4. मतदार यादीत नांव नोंदणीसाठीचे अर्जाचे नमुने संबंधीत तालुक्याच्या तहसीलदारांकडे देण्यात आले आहेत.
5. मतदार यादीत नांव नोंदविण्यासाठीचा अर्ज नमुना नं. 1 मध्ये संबंधीत तहसीलदार यांचेकडे दिनांक 20 जूलै 2018 ते दिनांक 18 ऑगस्ट 2018 या कालावधीत स्विकारले जातील.
6. प्रारुप मतदार यादी तयार झाल्यानंतर मतदार संघातील सर्व संबंधीत जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात, जिल्हाधिकारी, नांदेड यांच्या www.nanded.gov.in या संकेतस्थळावर (वेबसाईटवर) व गुरुव्दारा बोर्डाच्या कार्यालयात नियम आठ प्रमाणे उक्त मतदार यादी प्रसिध्द करण्यात येईल.
7. नियम 9 व 10 प्रमाणे कार्यवाही झाल्यानंतर नियम 11 नुसार अंतिम मतदार यादी प्रसिध्द करण्यात येईल.

**जिल्हाधिकारी, नांदेड करीता**

Scanned by CamScanner